



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष ३ रे | अंक : ७३३ . वा | मंगळवार | दि. ०९ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


## प्रतापराव-विजयराज शिंदेंमधील दिलजमाईचे प्रयत्न यशस्वी होतील का?

# आमदार शिंदेंनी अर्ज घेतला मागे, परंतु आमदार संजय गायकवाडांनाही आवरणे गरजेचे...

## मा.आ.विजयराज शिंदे व आ. संजय गायकवाड यांच्यातला दुरावा कमी करण्याच्या प्रयत्नात: खा.प्रतापराव जाधव

**जनसंचलन/बुलढाणा**

माजी आमदार तथा भाजपचे लोकसभा प्रभारी विजयराज शिंदे यांचा अनपेक्षितपणे दाखल झालेला अर्ज अखेर अपेक्षितपणे मागे घेतला गेला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भाजप-शिवसेनेमध्ये चाललेली पॉलिटिकल टसलच्या एका अंकावर यामुळे पडदा पडला आहे. तसेच प्रतापराव जाधव यांनी थेट आमदार विजयराज शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. प्रतापराव जाधव -विजयराज शिंदे यांच्यात वर्षानुवर्षे चाललेल्या कोल्ड वॉरचा हा अंत आहे का की, मतभेदांच्या विस्तवावर साचलेल्या राखेखाली अजूनही विस्तव जिवंत आहे, हे आगामी काळात कळणार आहेच. परंतु दुसरीकडे आमदार संजय गायकवाड यांना आवरणार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे. लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजण्यापूर्वीच भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी यंदा बुलढाणा लोकसभा मतदारसंघ आपल्याकडे घ्यावा, अशी मागणी आपल्या पक्षश्रेष्ठींकडे लावून धरली होती. पक्षश्रेष्ठींनीही कार्यकर्त्यांच्या भावना समजून मग हा मतदारसंघ आपल्याकडेच राहील, असे आश्वासन दिले होते. परंतु अखेर बुलढाणा लोकसभेसाठी प्रतापरावांची उमेदवारी घोषित झाली आणि भाजप कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला होता. भाजप कार्यकर्त्यांच्या भावना एव्हढ्या टोकदार होण्यामागे महत्वाचे कारण ते सांगतात की, प्रतापराव जाधव एकदा निवडून आले की, पाच वर्षे भाजप कार्यकर्त्यांना भाव देत नाहीत.भाजपचे लोकप्रतिनिधी निवडून आणण्यात मदत करीत नाहीत. त्यातच प्रतापराव आणि आमदार संजय गायकवाड यांचे कट्टर विरोधक मानले जाणारे विजयराज शिंदे हे भाजपचे लोकसभा मतदारसंघ प्रभारी असल्या कारणाने मग जिल्ह्यातील भाजप-शिवसेनेतून विस्तवही जात नसल्याची स्थिती होती. या स्थितीत प्रतापरावांना उमेदवारी घोषित झाल्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर होता. या नाराजीला वाट मोकळी करून देण्याचे काम विजयराज शिंदे यांनी केले. विजयराज यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल करून कार्यकर्त्यांच्या भावनांवर कुठएतरी फुंकर घालण्याचा प्रयत्न केला. विजयराज शिंदे यांचा अर्ज दाखल झाल्यामुळे एकीकडे प्रतापराव जाधव यांच्या विजयाच्या मार्गात लोखंडाचे काटे पेरल्या गेले, तर दुसरीकडे यामुळे भाजप-शिवसेनेतील दरी आणखी रुंदावली होती. असेच सुरू राहिले, तर त्याचा फटका प्रतापरावांना नक्कीच बसला असता. या स्थितीत मग विजयराज शिंदे यांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरू झाले. बुलढाण्यापासून नागपूर, नागपूरपासून ते मुंबई आणि मुंबईपासून ते पुन्हा बुलढाण्यापर्यंतचे फोन खणखणले. पक्षाने समजूत काढली. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले, त्यामुळे या संपूर्ण परिस्थितीत पक्षश्रेष्ठींचा मान राखणे आणि युती धर्म पाळणे या उद्देशातून



विजयराज शिंदे यांनी अखेर ८ एप्रिलला आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. विजयराज शिंदे यांनी ही उदारता दाखवत असल्याने मग प्रतापरावांना देखील दोन पावले पुढे जाऊन विजयराज शिंदे यांच्याशी दिलजमाई करावी लागलेली आहे. त्यामुळेच प्रतापराव हे अनेक वर्षांनंतर विजयराज शिंदे यांच्या निवासस्थानी पोहचले असावेत. वरिष्ठांच्या दबावातून हे दोन्ही नेते एकमेकांची गळाभेट घेतीलही, परंतु यातून अनेक प्रश्न पुन्हा उभे राहत आहेत. मुळात प्रतापराव जाधव आणि आमदार संजय गायकवाड एकीकडे, तर दुसरीकडे विजयराज शिंदे यांच्यातील मतभेद हे आतापर्यंत अक्षरशः टोकाला गेले होते. प्रतापराव आणि विजयराज शिंदे हे एकमेकांवर एव्हढ्या मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोपांचा चिखल उडवत नव्हते. मात्र, विजयराज शिंदे व आमदार संजय गायकवाड यांच्यातून तर आता विस्तवही जात नाही. जेंव्हा जेंव्हा विजयराज शिंदे यांच्यावर टीका करायची असते, तेंव्हा-तेंव्हा आमदार संजय गायकवाड यांची जीभ भयंकर तिखट झाल्याचे आजवर दिसून आलेले आहे. गायकवाडांच्या टीकेवर मग विजयराज शिंदे देखील आपल्या शैलीत उत्तर देत असतात. विजयराज शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर तर संजय गायकवाड यांच्या तळपायातली आग मस्तकात गेली होती. त्यांनी विजयराज शिंदे यांना खुले आव्हान दिले की, विजयराज शिंदे यांनी निवडणूक लढून दाखवावीच. दुसरीकडे विजयराज शिंदे यांनी आपला प्रचार देखील सुरू केला होता. कारण शिवसेनेकडून सातत्याने घेतल्या जाणाऱ्या मेळाव्यांमध्ये विजयराज शिंदे यांना डावलण्याचे काम केले जात होते. या आगीत मंत्री गुलाबराव पाटील यांनीही तेल ओतण्याचे काम केले. त्यांनी तर थेट विजयराज शिंदे यांची औकात काढली. शिंदे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर भाजप कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात विजयराज शिंदे यांच्या पाठीशी होते. ते जोरदारपणे कामाला लागले होते. विजयराज यांच्या उमेदवारीमुळे भाजपमध्येही आतल्या-आत कुठेतरी फूट पडल्याचे दिसून येत होते. ही संपूर्ण परिस्थिती पाहून भाजप व शिवसेनेच्या श्रेष्ठींच्या पोटात गोळा आला होता. कारण हा अंतर्गत वाद मिटवला नाही, तर या मतदारसंघात आपली डाळ शिजणार नाही, हे दोन्ही पक्षांच्या नेतृत्वाला चांगले माहिती होते. त्यामुळेच मग दिलजमाईचे हाय प्रोफाईल प्रयत्न सुरू झाले आणि आज स्थिती इथपर्यंत आली. प्रतापरावांनी दिलजमाईसाठी पुढाकार घेतला असला, तरी आमदार गायकवाड या दिलजमाईत सामिल होणार नाहीत, हे स्पष्ट आहे. दुसरीकडे विजयराज शिंदेंनी अर्ज तर माघारी घेतला, परंतु ते प्रतापरावांच्या प्रचारात किती सक्रियपणे व मनापासून उतरतील, यावर अद्यापही भलंमोठं प्रश्नचिन्ह आहे. या संपूर्ण राजकीय वादाच्या निखाऱ्यांवर वरवर जरी राख पसरलेली असली, तरी या राखेखाली निखारे पुढील बऱ्याच काळापर्यंत धगधगत राहतील, अशीच शक्यता दिसत आहे. त्याचे कारण म्हणजे अजूनही संजय गायकवाड यांची तीक्ष्ण भाषा तीच आहे, तर त्यांच्या प्रत्येक आरे ला कारे करण्याचे काम विजयराज शिंदे करीत आहेत. या संपूर्ण वादाच्या स्थितीत अखेर जिल्ह्यात काय राजकीय समीकरणे समोर येतील, भाजप-शिवसेनेच्या या वादाचा फायदा होतो का, की याचा फायदा विरोधक उचलतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मेरा खुर्द येथे इफ्तार पार्टीचे आयोजन नदीम देशमुख यांचे उत्कृष्ट नियोजन



**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले तसेच नदीमभाई देशमुख यांच्या देशमुख मेडिकल अँड एजन्सीज मेरा खुर्द चे उद्घाटन लोकनेते मा. आमदार राजेंद्र जी शिंगणे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी राष्ट्रवादी ओ बी सी सेलचे जिल्हाध्यक्ष सुभाष देव्हडे, शिवसेना तालुका उपप्रमुख प्रवीण वराडे, शेतकरी नेते अमनउल्हा खांसाब,राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष दीपक शिंगणे, महेंद्र वाघमोडे, दामू अण्णा वाघमारे, युनूस सरपंच, माजी सरपंच नंदकिशोर घोडे,शेवाळे मामा,सुधाकर शिंदे आदि उपस्थित होते याप्रसंगी शिंगणे साहेबांनी बोलताना सांगितले की मेरा खुर्द या गावात अनेक वर्षांपासून हिंदू मुस्लिम एकोप्याने राहात आहेत इफ्तार पार्टीमध्ये गावातील बहुसंख्य लोक उपस्थित होतेजे मेरा खुर्द येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले तसेच नदीमभाई देशमुख यांच्या देशमुख मेडिकल अँड एजन्सीज मेरा खुर्द चे उद्घाटन लोकनेते मा. आमदार राजेंद्र जी शिंगणे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी राष्ट्रवादी ओ बी सी सेलचे जिल्हाध्यक्ष सुभाष देव्हडे, शिवसेना तालुका उपप्रमुख प्रवीण वराडे, शेतकरी नेते अमनउल्हा खांसाब,राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष दीपक शिंगणे, महेंद्र वाघमोडे, दामू अण्णा वाघमारे, युनूस सरपंच, माजी सरपंच नंदकिशोर घोडे,शेवाळे मामा,सुधाकर शिंदे आदि उपस्थित होते याप्रसंगी शिंगणे साहेबांनी बोलताना सांगितले की मेरा खुर्द या गावात अनेक वर्षांपासून हिंदू मुस्लिम एकोप्याने राहात आहेत इफ्तार पार्टीमध्ये गावातील बहुसंख्य लोक उपस्थित होते

# राजे लखुजीराव जाधव ऐतिहासिक कालीन राजघराण्याची साक्ष देणारे आडगावराजा!



**जनसंचलन/सिंदखेडराजा**

महाराष्ट्र ही पुण्यवंताची, साधुसंताची भुमी प्रभुरामचंद्राची पवित्र सहवासाने पुणीत झालेली भुमी निसर्गाचे देणे महाराष्ट्राला भरभरुण लाभले.अनेक गौरवशाली राजघराण्यानी महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम केले.त्या राजे घराण्यापैकी राजे लखुजीराव जाधव (सिंदखेड राजा ) हे एक कर्तबगार , महापराक्रमी राजे होते.राजे लखुजीराव जाधव यांच राजघराण्यातील ऐतिहासिक साक्ष देणारे व राज घराण्याचे वैभव सांगणारे आडगाव राजा हे गाव राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेबांच्या जन्मभुमीचे शहर सिंदखेडराजा येथुन १२ कि.मी.अंतरावर असणारे व डोंगरावर वसलेले हे दिमाखदार गाव .गावात प्रवेश करण्यापुर्वीच दुरूणच दिसणारा ईतिहासाची साक्ष देणारा , नकळत आपल्याला ईतिहासाची आठवण करुण देणारा , दिमाखात ऊभा असलेला डोलदार किला नजरेस पडतो.किल्याच्या चोहो बाजुने असलेले भक्कम बुरूज किल्याची तटबंदी त्याकाळी शत्रु च्या आक्रमणापासुन संरक्षण करण्यास किती मजबुत होता हे आजही पाहताक्षणी निदर्शनास येते. किल्यामधे प्रवेश करण्यासाठी एकच मुख्य दरवाजा , किल्यामधे प्रवेश करता येणार नाही यासाठी किल्याच्या चोहोबाजुने ऊंच आणी मजबुत बांधलेली अप्रतिम भिंत जागोजागी असलेले बुरूज (परकोट) जेणेकरुन प्रत्येक बुरूजावरूण शत्रुवर तोफेचा मारा करता यावा या दृष्टीने बुरूज बांधलेले . आडगावराजा येथिल किल्यामधुन सिंदखेड राजा येथिल जिजाऊ जन्मस्थळावरील राजवाडा येथे जाणारा भुयारी मार्ग हे या किल्याचे वैशिष्ट्ये होय. त्याचप्रमाणे किल्याच्या आतमधे भुईकोट खोल्या आहे. सर्व ठिकाणी प्रवेश करण्यासाठी पायऱ्या आहेत. ऊजेड येण्यासाठी जागोजागी झरोके आहेत.किल्याच्या दक्षिणेस १५०फुट खोल दगडी बांधकाम केलीली पुरातन विहीर असुन या विहीरीमधे ऊतरण्यासाठी पायऱ्या आहेत.या विहीरी चे वैशिष्ट्ये म्हणजे विहीरीचे तळ जमिनीबरोबर असुन देखील त्या विहीरीला पाणी आहे. याच किल्ला परीसरामधे पंचधातुच्या ७ तोफा १९९० च्या दरम्यान सापडल्या असल्यामुळे हे ठिकाण शस्त्र सामुग्री चे होते या वरून दीसुन येते.या तोफा आजही पर्यटकाना पाहण्यासाठी जिजाऊ राजवाडा सिंदखेड राजा येथे ऊपलब्ध आहेत. किल्याच्या डाव्या बाजूस (ऊतर) शिवकालीन तलाव आहे .या प्रेक्षणीय तलावामधे कायमस्वरूपी पाणीसाठा असण्यासोबतच कमळाचे विलोभणीय फुले आहेत. .म्हणून च त्या काळात राजे लखुजीराव जाधवानी गावाला टंचाई भासु नये यासाठीच तलावाची निर्मिती केले आहे. .ईतिहासकालीन किल्यांचे, तलावाचे शासनाने सुशोभिकरण व सौंदर्यकरण केल्यास हे एक पर्यटनास योग्य ठिकाण ठरेल .आडगावराजा गावामधे तलावाच्या दक्षिणेस रेणुकादेवी हेमाडपंथी पुरातन मंदिर आहे.मंदिरामधे रेणुकादेवीमातेचा भव्य मुखवटा आहे.नवसाला पावणारी देवी म्हणून आजही लाखो भाविक महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातुन मोठ्या श्रद्धेने , भक्ती भावाने येथे दर्शनास , नवस फेडण्यास वर्षभर येतात.येथे नवराञोत्सवामधे ९दिवस कार्यक्रम होतात.व दहाव्या दिवसी होमहवन ,यज्ञ,ईत्यादी सह साधुसंताच्या पुजेचे कार्यक्रम होतात.तसेच चैत्रसुद्ध पोर्णीमेला मोठी याञा भरते याञेमधे याञेमधे विवीध नवस १२ गाड्या ओढणे,देवीची मिरवणूकासह वाघ्यामुरळीचे कार्यक्रम , देवीची राञ साजरी करणे,कुस्त्याचा फड सुधा या ठिकाणी दरवर्षी रंगतो ईत्यादी कार्यक्रम साजरे होतात.यात भाविकांचा ऊदंड प्रतिसाद लाभतो दरवर्षी प्रमाणे यावरशी सुद्धा चैत्र पौर्णिमा यात्रे निमित्ताने जंगी तयारी चालू आहे

# अवैध खोदकाम व वृक्षतोड संदर्भात चौकशी करा

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील दुसरबीड मलकापूर पांगरा ते साखरखेर्डा या २२२ क्रमांक डांबर रस्त्याच्या कडेलाच एका नामांकित कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभाग देऊळगाव राजा यांची कोणतीही परवानगी न घेता रस्त्याच्या कडेला केबल टाकण्यासाठी जेसीबी च्या साह्याने खोदकाम केलेले आहे .या बाबत आम्ही देऊळगाव राजा उपविभागीय अवियंता बालाजी काबरे यांना कळविले असता त्यांनी सबंधित कंपनीवर कुठलीही कार्यवाही केली नाही तसेच अवैध खोदकाम थांबविले नाही .सदर खोदकाम २ महिन्यापासून सुरू असून काबरा यांनी आर्थिक देवाणघेवाण करून या कंपनीला पाठीशी घातले असल्याचा संशय आम्हास बळवला आहे या अवैध रस्त्याच्या खोदकामाची चौकशी होऊन सबंधित कंपनीवर



दंडात्मक कारवाई करण्यात यावी बालाजी काबरा यांचे खाते निहाय चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे व तसेच शेंदुर्जन ते तांदुळवाडी फाट्या पर्यंत पाच वर्षापूर्वी सामाजिक वनीकरण विभागाने वृक्ष लागवड केली होती अजूनही दोन्ही बाजूने गर्द झाडे आढलून येतात परंतु सदर कंपनीने कोणतीही परवानगी न घेता ५०% पेक्षा जास्त वृक्षतोड केली असून याही प्रकरणाची चौकशी करण्यात यावी या साठी सिंदखेड राजा देऊळगाव राजा तालुका विकास यांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे

# होमिओपॅथी दिनानिमित्त १० एप्रिलला आरोग्य जनजागरण रॅली

**जनसंचलन/बुलढाणा**

होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांची जयंती, जागतिक होमिओपॅथी दिन व जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून येथील होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनतर्फे १० एप्रिल रोजी आरोग्य जनजागरण मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, संगम चौक येथून १० एप्रिल रोजी सकाळी ठिक ९ वाजता रॅलीला प्रारंभ होणार आहे. जयस्तंभ चौक, जनता चौक, कारंजा चौक, तहसील चौक, संगम चौक मार्गे जांभरुन रोडवरील डॉ. अजय ढगे यांच्या जुना दवाखाना परीसरात रॅलीचा समारोप होणार आहे. शहरातील सर्व होमिओ तज्ञ, विविध पॅथींचे वैद्यकीय तज्ञ, वैद्यकीय विद्यार्थी तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर रॅलीत सहभागी होणार आहेत. समारोपप्रसंगी डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जनजागरण रॅलीला नागरिकांनी



प्रतिसाद द्यावा, असे आवाहन डॉ. हॅनिमन जयंती उत्सव समिती अध्यक्ष डॉ. दुर्गासिंग जाधव व सचिव डॉ. सागर जोशी यांनी केले आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# दरवर्षीप्रमाणे बुलढाणा अर्बन परिवाराच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन






**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा शहरात दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा बुलढाणा अर्बन परिवाराच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. चिखली रोडवरील सहकार विद्या मंदीर येथे ८ एप्रिल रोजी सायकाळच्या सुमारास इफ्तार पार्टीचे आयोजन करून मुसलिम बांधवाना बोलवून शुभेच्छा देउन त्यांचे स्वागत करण्यात आले आहे.या कार्यक्रमला प्रमुख पाहुणे म्हणून बुलढाणा अर्बन संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी,जिल्हा पोलिस अधिक्षक सुनिल कडासने,बुलढाणा अर्बनचे कार्यकारी संचालक सुकेशजी झंवर,सहकार विद्या मंदिरच्या अध्यक्षा कोमलताई झंवर,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक अशोक लांडे,शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक ठाकरे उपस्थितीत होते. सहकार विद्या मंदिर येथे शिकणारे मुस्लिम विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच शहरातील मुस्लिम बांधव या इफ्तार पार्टीला मोठ्या संख्याने उपस्थितीत होते. ८ एप्रिल रोजी मुस्लिम बाधवांचा २८ वा रोजा आला आहे.सर्वप्रथम कार्यक्रम घेण्यात आला आहे. रमजान महिन्याविषयी त्यांची माहिती देत प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक सुनिल कडासने व बुलढाणा अर्बनचे कार्याकारी संचालक सुकेशजी झंवर यांनी रमजान महिन्याविषयी महत्व अतिशय योग्यप्रकारे सांगितले आहे.एक एक पोइंट त्यांनी समजून सांगितले आहे.बुलढाणा अर्बन परिवाराची परमंपरा आजही कायम आहे. दरवर्षी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येत असते.या वर्षीसुध्दा मोठ्या उत्साहाने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रम संपल्यानंतर मुस्लिम बांधवासाठी उपवास सोडण्यासाठी जेवण्याची व्यवस्था करून उपवास सोडला.वेगवेगळ्या प्रकारचे व्यजंन पदार्थ या ठिकाणी बनविण्यात आले होते.बुलढाणा शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्याने या इफ्तार पार्टीला उपस्थितीत होते.

# जाधव परिवाराकडून बुलडाणा येथील धम्म कुटीस भंतेंना जिवनावशक वस्तूचे दान...

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलडाणा येथील से.नि.शिक्षण विस्तार विमल बाबासाहेब जाधव अधिकारी बुलडाणा यांनी विदर्भ हाउसिंग सोसायटी बुलडाणा येथील ॲड. दिनेश गवई यांच्या वनश्री बंगल्यात वरच्या मजल्यावर धम्म कुटी दान दाते ॲड.दिनेश गवई व त्यांची पूर्णीगीनी सुवर्ण दिनेश गवई यांनी धम्म कुटी बनवून दिली आहे येथे श्रीलंकेचे भंते शांतीचित्त, भंते यश,भंते पूण्ण,भंते जीवीत तेथे रोज परित्राणपाठ, बुध्द वंदन,संडेस्कूल,धम्मदेशना असे विविध बौध्द धार्मिक कार्यक्रम केले जातात अशा या पावण धम्म कूटीत जाऊन धम्म उपासिका विमल बाबासाहेब जाधव परिवाराने धम्म कूटीत राहत असलेल्या भंतेना जिवनाअवश्यक वस्तूचे कीट दान दिले यावेळी खालील श्रध्दावान उपासक,उपासिकांच्या उपस्थीत समाजभूषण शाहीर डि.आर. इंगळे,निरंजन जाधव, शासनमान्य पत्ररकार संरक्षण समितीचे बुलडाणा जिल्हाकार्यध्यक्ष पत्रकार बाबासाहेब जाधव, गणेश झोटे, पद्माकर मगर, विजय गजभिये,जितेंद्र साळवे,नामदेवराव (एन.आर.) वानखडे, संजय चितळे,दिपक मिसाळ, छायाताई जाधव, विजयालक्ष्मी वाघमारे,आशाताई वानखडे, जयश्री जितेंद्र साळवे, सुनितताई शिवाजी गवई, सुनंदा गणेश झोटे, सुभद्राताई जाधव बहूसंख्य उपासक ,उपासिका उपस्थीतीत होते .

# सोन्याचे पाकीट लंपास करणाऱ्या २ महिलांना संभाजीनगर येथून अटक

**जनसंचलन/मलकापूर**




दोन महिलांनी शहरातील शनि मंदिराजवळ काही दिवसांपुर्वी पिशवीमधील अंदाजे ३१ ग्रॅम सोने ठेवलेले पाकीट गायब करून त्या महिलेचे सोने लंपास करणाऱ्या २ महिलांचा मलकापूर शहर पोलिसांनी शोध घेऊन त्यांना संभाजीनगर येथून अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याबाबतची माहिती अशी की, शहरातील श्रीरामनगर भागातील सविता श्रीराम काकडे यांनी मलकापूर शहर ठाण्यात १८ मार्च रोजी तक्रार दिली होती. त्यामध्ये १७ मार्च रोजी दुपारी जुनी सोन्याची पोथ गाठण्यासाठी, तसेच नवीन सोने खरेदीसाठी शनी मंदिराजवळील एका ज्वेलर्स येथे गेले होते. त्यावेळी तेथून ४ ग्रॅम ६६० मिलीग्रॅम व सोन्याचे पेंडन्ट ३ ग्रॅम १० मिलीग्रॅम असे खरेदी केले. तसेच जवळ असलेली जुनी सोन्याची २४ ग्रॅम पोथ असे एकूण ३१ ग्रॅम ६७० मिलीग्रॅम गाठण्यासाठी गेले. त्यावेळी २ महिला त्यांच्या मागे आल्या, ज्वेलर्सच्या आली.पिशवीमध्ये ठेवलेले पाकीट पळविले. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली होती. तर दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी भादंवि कलम ३७९, ३४ नुसार गुन्हा दाखल केला होता. गुन्ह्याचा तपासाला पोलिसांनी गती देत पोलिसांनी गुन्ह्याचा योग्यरीत्या तपास करून तांत्रिक बाबींचा आधार घेत यातील आरोपी महिला अनिता पारलेस काळे (३४), रा. वाडीगोद्री, ता. अंबड जि. जालना, ज्योती सचदेव पवार (३२) रा. रामगव्हाण बु. नालेवाडी, ता. अंबड, जि. जालना यांना छत्रपती संभाजीनगर येथून ५ एप्रिल रोजी ताब्यात घेत अटक केली. त्यांच्याकडून आतापर्यंत २१ ग्रॅम ६१० मिली सोने जप्त करण्यात आले. उर्वरित मुद्देमाल जमा होणे बाकी आहे. यातील दोनही महिला आरोपींना न्यायालयासमोर हजर केले. त्यांना २ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे

# लोकसभा निवडणुकीसाठी २१ उमेदवार रिंगणात...

## उमेदवारांना चिन्हे झाली वाटप...

**जनसंचलन/बुलढाणा**




बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज ४ उमेदवारांनी आज उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता एकूण २१ उमेदवार निवडणुकीसाठी अंतिम राहिले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. त्यानंतर उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करण्यात आले. बुलढाणा लोकसभा निवडणुकीतून विजयराज हरिभाऊ शिंदे अपक्ष, दिपक भानुदास जाधव - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमॉक्रॅटीक, ज्ञानेश्वर पुरूषोत्तम गणेश पाटील अपक्ष, नामदेव दगडू राठोड अपक्ष या चार उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. लोकसभा निवडणुकीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना आज निवडणूक चिन्हे वाटप करण्यात आले. यात गौतम किसनराव मघाडे बसपा हत्ती, प्रतापराव गणपतराव जाधव शिवसेना धनुष्यबाण, नरेंद्र दगडू खेडेकर शिवसेवा उद्धव बाळासाहेब ठाकरे मशाल, असलम शहा हसन शहा महाराष्ट्र विकास आघाडी गॅस सिलेंडर, मच्छिंद्र शेषराव मघाडे सोशालिस्ट पार्टी इंडिया - ऊस शेतकरी, माधवराव सखाराम बनसोडे - बहुजन रिपब्लीकन सोशालिस्ट पार्टी शिट्टी, मोहम्मद हसन इनामदार मायनॉरिटीज डेमोक्रॅटीक पार्टी - क्रेन, वसंत राजाराम मगर वंचित बहुजन आघाडी रोड रोलर, विकास भाई नांदवे भिमसेना - बॅट, प्रा. सूमनताई तिरपुडे पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक फळांची टोपली, संतोष भिमराव इंगळे - रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर ऑटो रिक्शा, अशोक वामन हिवाळे अपक्ष - बॅटरी टॉर्च, उद्धव ओंकार आटोळे अपक्ष - टेबल, गजानन जर्नादन धांडे अपक्ष - फलंदाज, दिनकर तुकाराम संबारे अपक्ष पेनाची नीब सात किरणांसह, नंदू जगन्नाथ लवंगे अपक्ष टीव्ही रिमोट, प्रताप पंढरीनाथ पाटील अपक्ष खाट, बाळासाहेब रामचंद्र इंगळे अपक्ष प्रेशर कुकर, रविकांत चंद्रदास तूपकर अपक्ष स्पॅनर, रेखा कैलास पोफळकर अपक्ष - कढई, संदीप रामराव शेळके अपक्ष कॅमेरा हे चिन्ह वाटप करण्यात आले आहे.

# विजय वडेट्टीवारांचं भाजपवर टीकास्त्र, म्हणाले- मोदींची वॉरंटी मात्र काँग्रेसची न्यायाची गॅरंटी...



वृत्तसंस्था/ अहेरी

देशातील नागरिकांना खोटी स्वप्ने दाखवून भूलथापांच्या राजकारणातून भाजपने सत्ता काबीज केली. गेल्या दहा वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचे वाटोळे करीत व्यापाऱ्यांचे हित जोपासून भाजपने संपूर्ण देशाला कर्जबाजारी केले आहे. देशातील शेतकरी देशोधडीला लागला असून महिला अत्याचार, बेरोजगारी, गुन्हेगारी यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. देशात धर्मांधतेच्या राजकारणातून अराजकता पसरविणे युवा पिढी आणि नागरिकांना दिशाहीन करणे हेच भाजपचे काम आहे. मोदींची वॉरंटी आहे पण काँग्रेसने मात्र न्यायची गॅरंटी दिली आहे, असं वक्तव्य विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे इंडिया आघाडी प्रणित महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रचारार्थ मुलचेरा, अहेरी, एटापल्ली आणि सिरोंचा येथे प्रचार सभेचा धडाका लावला. या सभांसाठी प्रमुख अतिथी म्हणून गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे इंडिया आघाडी प्रणित महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव कीरसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडचालवार, आरपीआय नेते रोहिदास राऊत, शरद पवार गटाचे अतुल गण्यार पवार तथा महाविकास आघाडी व घटक पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव काँग्रेस देणार, तरुणांना रोजगार देणार, आदिवासींना आपल्या जमिनीचा हक्क काँग्रेस मिळवून देईल, अशी भूमिका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मांडली. देशाची लूट करणाऱ्या सरकारला सत्तेतून पायउतार करण्यासाठी इंडिया आघाडी प्रणित महाविकास आघाडी हाच एकमेव पर्याय असून लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि घटक पक्षाच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा, असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले.पुढे बोलताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, क्षेत्रातील आदिवासी समाज असो किंवा बंगाली समाज असो या प्रत्येक समाजाला समान वागणूक ही काँग्रेसने दिली. आदिवासी समाजाला वन हक्काचे पट्टे देण्याचे काम काँग्रेस काळातच झाले. या परिसरातील सुरजागडला तीनशे हेक्टर जमीन मिळाली तर चेन्ना प्रकल्पाला का नाही..? असे विविध प्रश्न यावेळी विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी उपस्थित केले. या लोकसभा क्षेत्राचे भाजपचे गेल्या दहा वर्षापासून खासदार असलेले अशोक नेते ज्यांनी समस्या तर सोडा मतदारांना आजवर तोंड दाखवले नाही. पण आता मात्र जनतेला भेटणारा त्यांचा समस्या सोडविणारा खासदार म्हणजे डॉ किरसान तुमच्यासाठी काम करणार, म्हणूनच इंडिया आघाडीच्या उमेदवारांना जिंकून द्या, असे आवाहन विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

## बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाचा काँग्रेसला पाठिंबा, अमरावती पाठोपाठ अकोल्यात भाजपला धक्का

वृत्तसंस्था/ अकोला

बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्षाने स्थानिक पातळीवर अकोल्यात महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांना पाठिंबा दिला आहे. अकोल्यात प्रहारच्या जिल्हा मेळाव्यात जिल्हा कार्यकारिणीने काँग्रेस उमेदवार डॉ. अभय पाटील यांना पाठिंबा देण्याची मागणी बच्चू कडूंकडे केली. बच्चू कडू देखील कार्यकर्त्यांच्या भावनांचा सन्मान राखत अकोल्यात काँग्रेसला पाठिंब्याचा निर्णय घेणार असल्याचे संकेत आहेत. अमरावतीत देखील प्रहारने भाजप उमेदवार नवनीत राणा यांच्याविरोधात उमेदवार देऊन भाजपविरोधात दंड थोटपले. अमरावतीपाठोपाठ अकोल्यातही प्रहारने भाजपला धक्का दिला आहे.महायुतीतले अकोल्यातले भाजप आमदार रणधीर सावरकर यांच्याकडून प्रहारला पाहिजे तसा सन्मान आणि अपेक्षा वागणूक दिली जात नाहीये. याचा रोष आज प्रहारच्या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनात आहे. म्हणून या निवडणुकीत रणधीर सावरकर यांच्यामुळे स्थानिक प्रहार पक्ष काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देत असल्याचे प्रहारचे जिल्हाध्यक्ष कुलदीप



पाटील वसू यांनी म्हटले.प्रहारच्या या निर्णयाचे अकोल्यातील ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुखांनी स्वागत केले आहे. बच्चू कडू यांच्या संभाव्य निर्णयामुळे अकोल्यातील महाविकास आघाडीची बाजू भक्कम झाल्याचे आमदार देशमुख म्हणाले. बच्चू कडू नेहमी सत्याच्या बाजूने उभे राहणारे आहे, एकनाथ शिंदेंना बच्चू कडूंनी नव्हे तर भाजपने अडचणीत आणलंय. सांगलीचा तिढा लवकरच सुटणार असेही देशमुख म्हटले.मागील काही काळ बच्चू कडू हे अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राहिले आहे. यादरम्यान त्यांचे अकोला जिल्ह्यात अनेक समाजाच्या प्रमुखांशी जवळीक संबंध आहे. बच्चू कडू यांना मानणारा एक मोठा वर्ग अकोल्यात आहे. अकोला लोकसभा मतदारसंघातल्या अकोट विधानसभा मतदारसंघात प्रहारने २०१९ च्या निवडणुकीत तुषार पुंडकर निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. तेव्हा २३ हजार ९३४ इतके मतदान प्रहारला मिळाले. याशिवाय प्रहारने जिल्हा परिषदेतही खाते उघडलं होते. दरम्यान, अकोल्यात वंचित बहुजन आघाडीकडून खुद्द प्रकाश आंबेडकर, महाविकास आघाडीचे (काँग्रेस) उमेदवार डॉ. अभय पाटील आणि भाजपकडून (महायुती) अनुप धोत्रे हे निवडणुकीच्या रिंगणात असणार आहे. त्यामुळे प्रहार पक्षाचा पाठिंबा काँग्रेसचे उमेदवार अभय पाटील यांच्यासाठी कितपत फायदेशीर ठरणार, की भाजपसाठी नुकसानदायी ठरणार, हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

## ऊस उत्पादकांचा मतदानावर बहिष्कार; बुलढाणा, जळगाव येथील जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

जनसंचलन/बुलढाणा

उच्च न्यायालयाचे आदेश होऊनदेखील खान्देशमधील फैजपूर येथील मधुकर सहकारी साखर कारखान्याकडून उसाच्या थकबाकीचे सुमारे २० कोटी रुपये मिळाले नाही. यावरून संतप्त मलकापूर तालुक्यातील हरसोडा आणि खान्देशमधील अनेक गावांतील साडेतीन हजार ऊस उत्पादक कुटुंबातील २१ हजार शेतकरी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकणार आहेत. बुलढाणा व जळगाव (खान्देश)च्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे हा इशारा देण्यात आला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उसाची लागवड करून गत पाच-सहा वर्षांपूर्वी फैजपूरच्या मधुकर सहकारी साखर कारखान्याला ऊस दिला. मात्र, ऊसविक्रीचे पैसे कारखाना मालकाने अद्याप दिले नाही. अर्ज, विनंत्या करूनदेखील काहीच फायदा लाभ झाला नाही. शेवटी थकबाकी मिळण्यासाठी लोकशाही मार्गाने शेतकऱ्यांनी लढा सुरू केला. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली. त्यावर सुनावणी झाली आणि १२ डिसेंबर २०२३ ला शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल लागला. या निकालात दोन महिन्यांच्या



आत उसाची थकबाकी अदा करावी, असे आदेश देण्यात आले. त्यावर चार महिन्यांचा काळ लोटला तरी कारखाना प्रशासनाने पैसे दिले नाही. न्यायालयाच्या आदेशानंतरही न्याय मिळत नसल्याने ऊस उत्पादकांनी बहिष्काराचे हत्यार बाहेर काढत लोकसभा निवडणुकीत मतदान न करण्याचा इशारा दिला आहे. रावेर लोकसभा मतदारसंघाचा उगम झाल्यानंतर खान्देशलगत असलेल्या मलकापूर विधानसभा मतदारसंघ (मलकापूर, नांदुरा तालुके)रावेरला जोडण्यात आला. त्यामुळे रावेर लोकसभेसाठी मतदान करावे लागते. जिल्हा बुलढाणा असल्याने बुलढाणा जिल्हाधिकारी आणि रावेर लोकसभा मतदारसंघात येत असल्याने जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.या निवेदनावर रवींद्र रायपुरे, शोभा सुरेंद्र रायपुरे, व्ही. पी. पवार, गोपाळ रायपुरे, संतोष तुरक, कडूबा कहाते, गजानन पूरक, सुगंधा तुरक यांच्यासह असंख्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958